# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

विभागीय कार्यालय, पुणे विभाग,
५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -४११०३७
दूरध्वनी - ०२० २४२०६८८०/८८१
Email:- pune.ro@mswc.in
**Website: mswarehousing.com**


## निविदा (Short Tender Notice)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे आंबी, तळेगाव MIDC रोड, ता. मावळ, जि. पुणे येथील ६००० MT क्षमतेचे गोदाम (लांबी ८३.४२३ मीटर, रुंदी ३६.४३४ मीटर आणि उंची १२ मीटर एकूण क्षेत्रफळ ३२७०५.४५ चौ फुट) सुविधा '**AS IS WHEAR IS**' पद्धतीने लॉक अॅन्ड की भाडे तत्त्वावर भाडे दरात प्रती वर्षी किमान ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (३+२) देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी औद्योगिक कंपन्या/संस्था, व्यापारी, सहकारी संस्था, कारखाने, खत कंपन्या आणि शेतमाल उत्पादक संस्था यांना द्यावयाचे आहे. तरी आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या इच्छुक निविदाकारांकडून सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तीन महिन्याचे साठवणूक भाडे विना व्याज सुरक्षा तारण ठेव म्हणून महामंडळाकडे जमा करावे लागेल. गोदामातील मालाचा विमा, गोदाम सुरक्षा व्यवस्था, पाणी-वीज देयकाची अदायगी ठेवीदाराला करावी लागेल.

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या वरील पत्त्यावरील कार्यालयात दि.३१.१२.२०२५ ते दि.०६.०१.२०२६ या कालावधीत सायंकाळी ५ वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) स्पर्धात्मक दरासहीत पोहोच होतील अश्या बेताने पाठवावेत किंवा प्रत्यक्ष पोहोच करावेत. प्राप्त निविदा/दरपत्रके विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या कार्यालयात दि.०७.०१.२०२६ रोजी दुपारी ४ वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर केलेल्या तारखेला उघडण्यात येतील. त्यावेळी इच्छुक निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी विभागीय कार्यालय, पुणे येथे उपस्थित राहू शकतील. सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत तीन वर्षाचा Audit Report आणि IT Return ची प्रत तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.

- सदर गोदामाच्या रुफींगसाठी स्क्रूलेस गॅलव्हॅल्युम क्लीपलॉक शीट, साईडला गॅलव्हॅल्युम पत्र्याचे वॉल क्लॅडींग. ट्रिमीक्स फ्लोरींग, खेळत्या हवेसाठी व्हेंटीलेटर्स तसेच मालाची हाताळणी करण्यासाठी प्रत्येकी १५ टन क्षमतेचे २ डॉकलेव्हलर बसविलेले आहेत.
- गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता, निविदा, स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.
  स्पर्धामत्क

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**Dy. General Manager**
**Pune Ragion.**